# सुस्वागतम

सत्यमेव जयते

भारत हा संस्कृती प्रिय देश आहे. स्त्रीचे स्थान देवीसमान आहे. भारतीय राज्य घटनेने स्त्रिला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. न्यायव्यवस्थेने जागरुक राहिले पाहिजे.



# महिलांची कामाच्या ठिकाणावर होणारी लैंगिक छळवणूक

# (प्रतिबंध, मनाई आणि इलाज )

# अधिनियम 2013.

**अधिनियम 2013 अंतर्गत एकुण 8 प्रकरणे असुन यात 30 कलमे आहेत.**

# महिलांची कामाच्या ठिकाणावर होणारी लैंगिक छळवणुक ( प्रतिबंध, मनाई आणि इलाज ) अधिनियम 2013 :

कलम 19 अन्वये कर्मचारी/अधिका-यांना

कायद्यातील तरतुदींबाबतीत सचेतन करण्यासाठी व अंतर्गत समितीतील सदस्यांसाठी कार्यशाळा.

# भारताचे संविधान:मुलभूत हक्क

## समानतेचा हक्क

कलम 14:राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता अथवा कायदयाचे संरक्षण नाकारणार नाही.

# भारताचे संविधान:मुलभूत हक्क

## समानतेचा हक्क

कलम 15: धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करण्यास मनाई.



# भारताचे संविधान:मुलभूत हक्क

**कलम 19:**

1)सर्व नागरिकांस

- क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क
- घ) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालवण्याचा हक्क असेल.

# RIGHT TO LIVE WITH DIGNITY

## भारताचे संविधान:मुलभूत हक्क

**कलम 21:-जीवित व व्यक्तीगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण**

**कलम 21: कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपध्दती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.**

# भारताचे संविधान

## राज्य धोरणांची निर्देशक तत्वे-भाग-चार

कलम 39:-राज्य हे विशेषतः पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखिल-

- ❖ (क) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा.
- ❖ (ख) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करुन घेण्यात येऊ नये.

कलम 42: राज्य हे कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी  व प्रसुतिविषयक सहाय्यासाठी तरतुद करील.

# मुलभुत कर्तव्ये

## अनुच्छेद 51:-


(ड) नुसार स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणा-या  प्रथांचा त्याग करणे.

(ज) विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

हे प्रत्येक भारतीय नागरीकांचे कर्तव्ये असेल.

# विशाखा एवं संदर्भ समुह

राजस्थान मधल्या सामाजिक संघटनांनी/महिला संघटना एकत्र येऊन मा. सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल कण्यात आली ( 1992 च्या रिट विनंती अर्ज सीआरएल क्र.666-70 ) विशाखा एवम संदर्भ समुह या संघटनेने पुढाकार घेतल्याने या जजमेंटला विशाखा जजमेंट म्हटले गेले.



# भंवरी देवी

- राजस्थानच्या महिला व बाल विकास प्रकल्पात सामाजिक कार्यकर्तो भटेरी गावातील कुंभार समाजातील अदभुत साहस व मनोर्धैर्य असलेली स्त्री
- निरजा भानोत पुरस्काराने सन्मानित.
- महिला परिषदांमध्ये भारतीय स्त्रिचे प्रतिनिधीत्व.
- जीवनावर आधारित बवंडर हा चित्रपट.
- 1992 मध्ये बाल विवाह रोखण्याचा यशस्वी प्रयत्न केला.
- प्रस्थापित गुर्जर समाजातील लोकांनी सामुहिक अत्याचार केला.
- राजस्थान जिल्हा न्यायालयाने भंवरी देवीच्या विरोधात निकाल दिला.



# विशाखा मार्गदर्शक तत्वे

## (Vishakha Guidelines)

- लैंगिक छळाची व्याख्या स्पष्ट केली गेली.
- महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून सुरक्षा देणे.
- कार्यालय प्रमुखाने तक्रार निवार समित्या स्थापन करणे.
- कामाच्या ठिकाणी विश्रांती, आरोग्य, स्वच्छता विषयक सुविधा पुरविणे.
- सेवा नियमांमध्ये सुधारणा करणे/ शिक्षेची तर तुद करणे.
- संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे.
- कामाच्या ठिकाणी पोषक वातावरण तयार करणे.
- **"Awarness compaign"** जनजागृती करणे

## The Guidelines and norms prescribed are

1. It shall be the duty of the employer to preventer deter the acts of sexual harassment.
2. Definition of sexual harassment. (लैंगिक छळ व्याख्या)
3. Preventive steps.
4. Criminal proceedings.
5. Disciplinary action. (Amend the rules and regulation.)
6. Complaint mechanism.
7. Complaint committee. ( तक्रार निवारण समित्या स्थापन करणे.)
8. Workers initiative.
9. Awareness (जनजागृती निर्माण करणे.)
10. Third party harassment.

Etc.





शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: एसआरव्ही-1072/डी, दिनांक 15 जूलै 1972 मा.सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सुचनांपुर्वी महिला कर्मचा-यांच्या गा-हाण्यांचा विचार करण्यासाठी 15 जूलै 1972 च्या परिपत्रकान्वये विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी चौकशी समिती अस्तित्वात होती.

## शासन निर्णय क्रमांक:अेएसआरव्ही/1099/72/मकअ मंत्रालय, मुंबई-400 032 दिनांक 19 मे 1999

सदर शासन निर्णयान्वये शासकिय सेवेतील महिला कर्मचा-यांच्या समस्यांची तपासणी करण्यासाठी महिला तक्रार निवारण समित्यांचे गठण प्रत्येक शासकिय/ निमशासकिय/अशासकिय कार्यालयामध्ये/कामाच्या ठिकाणी बंधनकारक केले गेले.

स्त्रिला सन्मानाने जगता यावे म्हणून

The sexual harassment of women at work place (Prevention, Prohibition and redressal ) act 2013 हा कायदा सन 2013 मध्ये अस्तित्वात आला व नियम 9/12/2013 रोजी अस्तित्वात आले.



## या आठ प्रकरणांवर एक दृष्टीक्षेपः

प्रकरण-1 :- प्राथमिक/ कायद्याची ओळख, नाव, शिर्षक व्याप्ती.

प्रकरण-2:-अंतर्गत वाद समितीची बांधणी/गठण.

प्रकरण-3:- स्थानिक वाद समितीचे गठण/बांधणी

प्रकरण-4 :-तक्रार, समेट, तपास.

प्रकरण-5:-चौकशी अहवाल, अपील/आव्हान

प्रकरण-6:-नियोजक/मालकाचे कर्तव्ये.

प्रकरण-7:-जिल्हा अधिकारी यांचे कर्तव्ये आणि अधिकार

प्रकरण-8 :-वार्षिक अहवाल व इत्यादी संकिर्ण बाबी.

## (न) लैंगिक छळाची व्याख्या:-

लैंगिक छळवणूक यांत कोणत्या कृत्यांचा अथवा वर्तणुकीचा समावेश असेल.

(क) शारिरीक संबंध आणि पाठबळ किंवा,

(ख) लैंगिक फेवर साठी मागणी अथवा विनंती किंवा

(ग) लैंगिकतेचा बाज असलेले भाष्य करणे, किंवा

(घ) पोर्नोग्राफी दाखविणे किंवा

(च) अश्लिल स्वरुपाची इतर कोणतेही अस्वागतार्ह शारिरीक, वाचिक अथवा गैर-वाचिक वर्तणूक/वागणुक

# शासन निर्णय महिला व बालविकास विभाग, 15 जून 2014.

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक  छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व इलाज ) अधिनियम, दि.23 एप्रिल 2013 व नियम दि. 9 डिसेंबर 2013 त्यानुसार प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समितीचे गठन बंधनकारक.

# कलम 3: लैंगिक  छळाची विस्तृत व्याख्या.

खाली उल्लेख केलेली परिस्थिती उदभवल्यास ते लैंगिक छळ होईल.

(क) तिच्या नौकरीत नुकसानकारक वागणुक देण्याविषयी,

(ख) सुचविलेले किंवा व्यक्त केलेले वचन किंवा भिती,

(ग) तिच्या सद्यस्थितीतील किंवा भविष्यातील नौकरीच्या स्थितीविषयी सुचविलेली किंवा व्यक्त केलेली भीती.

(घ) तिच्या नोकरीच्या कामात हस्तक्षेप करणे, किंवा तिच्यासाठी दहशतीचे किंवा  अपमानकारक किंवा प्रतिकुल वातावरण निर्माण करणे, किंवा

(च) अशी अपमानकारक वागणुक जी तीची सुरक्षा किंवा आरोग्य धोक्यात आणू शकते.

# प्रकरण -2

## अंतर्गत वाद समितीची बांधणी/गठण कलम:4(1)

- प्रत्येक प्रशासकीय एकक/कार्यालयाच्या ठिकाणी.
- कार्यालय प्रमुख अंतर्गत वाद समितीचे गठण करेल.
- प्रशासकीय एकक/कार्यालयाच्या ठिकाणी 10 किंवा 10 पेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी.
- 10 पेक्षा कमी अधिकारी/कर्मचारी : स्थानिक तक्रार समिती कडे तक्रार.

# समन्वय अधिका-याची निवड व जबाबदारी

उपजिल्हाधिकारी ग्रामिण किंवा आदिवासी क्षेत्रासाठी प्रत्येक गट, तालुका व तहसिल मध्ये नागरी क्षेत्रातील प्रभाग किंवा नगरपालीकांमध्ये समन्वयक अधिका-यांची निवड करतील.

समन्वय अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील तक्रारी स्थानिक तक्रार समितीकडे 7 दिवसांत पाठवतील.

# अंतर्गत वाद समितीतील सदस्यांची नेमणुक कलम 4(2)

अ) कार्यालयातील वरिष्ठ महिला अधिकारी अध्यक्ष असेल (1)

ब) महिलांच्या सोयीसाठी बांधील/सामाजिक कार्याचा अनुभव/कायद्याचे ज्ञान असणा-या कर्मचा-यामधून किमान दोन सदस्य (2).

क) महिलांच्या न्याय हक्कांसाठी बांधील अशासकीय संघटना किंवा संघ/लैंगिक छळाशी संबंधित प्रश्नांशी परिचित व्यक्ती एक सदस्य नामनिर्देशित करावयाच्या एकुण सदस्यसंख्येच्या किमान निम्मे/अर्धे सदस्य महिला सदस्य असतील.

# प्रकरण -2 अंतर्गत तक्रार समितीचे कामकाज

❖ अधिनियम, 2013 व नियम 2013 मधील तरतुदीनुसार प्राप्त तक्रार अर्जानुसार चौकशी करणे व

❖ लैंगिक छळवणुकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणासाठी उपाययोजना करणे

❖ नियत कालिक बैठका घेऊन सुरक्षित वातावरणाच्या निर्मिती बाबत खात्री करणे.

❖ अधिनियमामधिल तरतुदीनुसार वार्षिक अहवाल तयार करणे.

# कलम 4 (3): सदस्यत्वाचा कालावधी तीन वर्ष

नियुक्तीच्या तारखेपासून प्रत्येक सदस्य हा तीन वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी पद धारण करेल.

# कलम 4 (4): फी किंवा भत्ते

❖ प्रतिदिन 200 रुपये भत्याचा हक्क असेल.

❖ वातानुकुलित रेल्वे/बस  किंवा ऑटो रिक्षा/ टॅक्सी खर्च किंवा प्रत्यक्षातील प्रवासावर खर्च. (जे कमी असेल ते )

❖ नियोजक/ मालक भत्ते अदा करेल.

# उपजिल्हाधिकारी जिल्हा अधिकारी म्हणून घोषित

नियुक्तीच्या शासन निर्णय क्रमकचौ-2014/प्र.क्र.63/ 11 सप्टेंबर 2014 अन्वये कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण ( प्रतिबंध, मनाई व निवारण ) अधिनियम 2013 व नियम दि. 9 डिसेंबर 2013 अंतर्गत या अधिनियमात नमुद केलेली कार्ये पार पाडण्यासाठी प्रत्येक जिल्हयाचे उप जिल्हाधिकारी यांना या अधिनियमाच्या अंमलबजावणी अंतर्गत जिल्हा अधिकारी म्हणून (District Officer) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

## प्रकरण -2

## स्थानिक वाद समितीची बांधणी/गठण कलम 6(1)

- प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी (District Officer) स्थानिक वाद समितीचे गठन करेल.
- जेथे 10 पेक्षा कमी अधिकारी/कर्मचारी किंवा
- जेथे अंतर्गत वाद समितीची बांधणी झाली नाही किंवा
- जेथे नियोजक/मालकाच्या विरोधात तक्रार आहे.
- अशा आस्थापनेवरील तक्रारी स्विकारेल
- संपुर्ण जिल्हयात अधिकार क्षेत्र असेल.

# शासन निर्णय महिला व बालविकास विभाग, 11 सप्टेंबर2014.

❖ म्हणजेच उपजिल्हाधिकारी स्थानिक तक्रार समितीचे गठन करतील.

❖ स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करतील.

❖ लैंगिक छळास प्रतिबंध व निवारण करणे, कार्यालयात सुरक्षिततेचे वातावरण निर्मितीसाठी जागृती निर्माण करणे/ कार्यशाळा आयोजित करणे.

❖ समितीच्या सदस्यांच्या नावाचा फलक  दर्शनी भागात लावावा.

# प्रकरण -3

## स्थानिक तक्रार समितीची रचना कार्यकाल:कलम 7(1)

खालील प्रमाणे सदस्यांची नेमणुक जिल्हाधिकारी करतील.

(अ) सामाजिक कार्याचा 5 वर्षाचा अनुभव व महिलांच्या सोयीसाठी बांधील स्त्री अध्यक्ष

(ब) जिल्हयातील गट/ तालुका/तहसिल/प्रभाग/नगरपालिका या कार्यालयामधिल एक महिला सदस्य.

(क) ( दोन सदस्यांपैकी एक स्त्री सदस्य असेल)

महिलांच्या न्याय हक्कासाठी प्रतिबध्द असलेली अशासकिय संघटना/संघ किंवा

लैंगिक छळवणुक या विषयाशी परिचित व्यक्ती.

किमान एक नेमलेली व्यक्ती कायद्याचे ज्ञान/वारसा

किमान एक अजा/अज/इमाव/अल्पसंख्यांक समाजातील एक महिला असेल.

(ड) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे सदस्य सचिव असेल.

कलम 7 (2) : अध्यक्ष किंवा सदस्य तीन वर्षासाठी पदधारण करेल.

# महिलांची कामाच्या ठिकाणावर होणारी लैंगिक छळवणुक

# (प्रतिबंध, निषेध आणि इलाज करणे ) नियम 2013

नियम 5: स्थानिक समितीचा मुख्य/अध्यक्ष कामकाज चालविण्यासाठी प्रतिदिन दोनशे पन्नास रु. भत्यास पात्र असेल.

नामनिर्देशित सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यास प्रतिदिन 200 रु. भत्ता वातानुकुलीत रेल्वे/बस,ऑटोरिक्शा/टॅक्सी खर्च/प्रवास खर्च जिल्हाधिकारी भत्ते अदा करतील.

# कलम 11 (3) : अंतर्गत/स्थानिक समितीचे अधिकार

❖ दिवाणी कोर्टास, दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 ( 5 चा 1908 ) नुसार जे अधिकार प्राप्त झालेले असतात समितीसही तसेच अगदी समान अधिकार असतात खालील प्रमाणे खटले चालविण्यासाठी

(अ) प्रतिवादीस/साक्षीदारास समन्स काढून हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तपासणे.

(ब) आवश्यक कागदपत्रांचा शोध लावून दाखल करणे

(क) समिती नव्वद दिवसांच्या आंत चौकशी पुर्ण करेल.

# प्रकरण-4

## कलम 9 : तक्रार/वाद :

- पिडीत महिला
- लैंगिक छळवणुकीची तक्रार लेखी स्वरुपात घटनेच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आंत करु शकेल.
- तीन महिन्याची मुदतवाढ देता येईल.
- कायदेशीर वारस किंवा नेमलेली व्यक्ती तक्रार करु शकतील.

# प्रकरण-4

## कलम 10 : समेट

- चौकशी सुरु करण्यापुर्वी पिडित महिलेच्या विनंतीवरुन समेटासाठी पाऊले उचलली जातील.
- आर्थिक तडजोड समेटाचा पाया असणार नाही.
- समेट झाल्यास पुढील चौकशी होणार नाही.
- समेट झाल्याच्या प्रति प्रतिवादीस व पिडीत महिलेस दिल्या जातील.
- तडजोडीतील कोणतीही अट किंवा शर्त प्रतिवादी पुर्ण करत नसेल असे पिडित महिलेने कळविल्यास यथास्थिती तक्रारीची चौकशी होईल.

# लैंगिक छळवणूक नियम, 2013 मध्ये तक्रारीतील चौकशीची पध्दत

❖ तक्रारदार समितीकडे तक्रारीच्या सहा प्रती कागदपत्रांसहीत साक्षीदाराचे नाव आणि पत्यासहीत दाखल करेल.

❖ तक्रारीची प्रत प्रतिवादीस सात कामाच्या दिवसाच्या आंत पाठविली जाईल.

❖ प्रतिवादी बचाव/खुलासा साक्षीदारांचे नाव पत्यांसह दहा कामाच्या दिवसांत दाखल करेल.

❖ लागोपाठ तीन सुनावणी ठेवल्या जातील.

❖ चौकशी प्रक्रिया संपुष्टात आणण्याचा अधिकार

❖ त्यापुर्वी पंधरा दिवसांची आगाऊ लिखित नोटीस दिली जाईल.

❖ विधी व्यावसायिकास नेमता येणार नाही.

❖ गणपुर्ती आवश्यक असेल/ नैसर्गीक न्यायतत्वानुसार चौकशी होईल.

# प्रकरण-4

- प्रतिवादी हा कर्मचारी असल्यास, सेवाशर्तीच्या नियमाखाली चौकशी सुरु होईल.
- सेवाशर्ती नियम नसल्यास कलम 509 () अन्वये पोलीसांकडे गुन्हा नोंदविला जाईल.
- चौकशीच्यावेळी दोन्हीही पक्षकार कर्मचारी यांना ऐकुण घेण्याची संधी.
- चौकशीतील निष्कर्षाची प्रत उपलब्ध होईल.
- समितीसमोर निष्कर्षांना आव्हानाने निवेदन देता येईल.

# प्रकरण-5

**कलम 14 :खोटी/बनावट किंवा द्वेषपुर्ण आणि खोटी साक्ष यासाठी शिक्षा.**

- ❖ चौकशी दरम्यान प्रतिवादी विरुध्दचे दोषारोप द्वेषपुर्ण आढळले.
- ❖ तक्रारदाराने दिलेला द्वेषपुर्ण मजकुर निर्देशित केलेल्या पध्दतीनूसार चौकशीत सिध्द झाल्यास.
- ❖ तक्रारदार/साक्षीदाराने बनावट/चुकीचे कागदपत्रे सादर केल्यास समिती पिडीत महिले विरुध्द अथवा साक्षीदाराविरुध्द सेवाशर्ती नियमांच्या तरतुदींनुसार कार्यवाहीची शिफारस करेल.

# लैंगिक छळवणूक नियम, 2013 : नियम 9

सेवानियम अस्तित्वात असलेल्या प्रकरणांव्यतिरिक्त जेव्हा प्रतिवादी विरुध्द चौकशीत आरोप सिध्द झाले तर समिती

1) लेखी माफी, सुचना
2) ताकीद/ठपका अथवा खरडपटटी काढणे
3) बढती रोखणे
4) पगारातील वाढ रोखणे
5) प्रतिवादीस कामावरुन कमी करणे/ काढून टाकणे
6) समुपदेशनाचे सत्र अथवा कम्युनिटी सर्व्हिस देणे.

वरिल प्रमाणे शिफारस करेल.

# प्रकरण-5

## कलम 13: चौकशी अहवाल

- समिती निष्कर्षाचा अहवाल चौकशी पुर्ण झाल्याच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत नियोजक/मालक /जिल्हाधिकारी यांना पुरवेल.
- चौकशी अहवालाची प्रत संबंधित पक्षकारांना उपलब्ध करुन देईल.
- प्रतिवादी विरुध्द दोषारोप सिध्द होत नसल्यास वाद प्रकरणी कार्यवाही न करण्याची शिफारस करेल.

# कलम-18:- अपिल/आव्हान .-

चौकशी अहवालातील शिफारशीने बाधित/पिडित व्यक्ती न्यायालय किंवा न्यायधिकरणाकडे अपील

निर्देशित पध्दतीने अपील

अपिल शिफारसीपासून नव्वद दिवसांच्या आंत.

## दोषारोप सिध्द होत असल्यास कलम 13 (3) खालील प्रमाणे शिफारस करेल.

- (क) सेवाशर्ती नियमानुसार गैरवर्तणुक ठरवून कार्यवाही भारतीय दंड संहिता (45 चा 1860 ) च्या कलम 509 अन्वये गुन्हा नोंदविण्यासाठी पोलीसांकडे
- (ख) नुकसान भरपाई म्हणून निश्चित केलेली रक्कम वेतन किंवा पगारातून अदा करणे.

# प्रकरण-5

## कलम 12: चौकशी प्रलंबित असतानाची कार्यवाही

- कलम 12 : विनंतीवरुन पिडित महिला किंवा प्रतिवादी यांची बदली
- तीन महिन्यापर्यंतची रजा मंजूर करणे.
- इतर सहाय्य करणे.
- शिफारशी नियोजक/ मालक लागू करेल व तसा अहवाल समितीला पाठवेल.

# लैंगीक छळवणुक नियम, 2013: नियम 8

## तक्रारदारास चौकशी अनिर्णित असतांना सहाय्य:

- 8 (अ): पिडीत महिलेचा Performance Report Confidential Report बाबत Reporting आणि Reviewing Officer चे काम ज्याच्या विरुध्द तक्रार आहे त्यांना दिले जाऊ नये
- शैक्षणिक संस्थेंच्या बाबतीत शैक्षणिक कामकाजावर देखरेखीचे काम दिले जाऊ नये (Supervisionary) पिडीत महिलेचे प्रतिवादीने CR लिहिणे/ Review करणे / Report करणे कामाचे Supervision करणे हे अधिकार दिले जाऊ नयेत अशी समिती शिफारस करेल.

# प्रकरण-8 (संकीर्ण )

## कलम 21: वार्षिक अहवाल दाखल करणे:-

- अंतर्गत/स्थानिक तक्रार समिती विहित नमुन्यात वार्षिक अहवाल जिल्हा अधिकारी यांना सादर करेल.
- जिल्हा अधिकारी संक्षिप्त अहवाल महिला व बाल विकास विभागास 30 एप्रिल पुर्वी सादर करेल.

## कलम 16: तक्रार आणि चौकशी कामकाजातील मजकुर छापण्यास किंवा जाहीर करण्यास बंदी/मनाई

मजकूर/अहवाल जनतेस, मुद्रणालय आणि प्रसार माध्यमांना देऊ नये, चर्चेस देऊ नये, जाहीर करु नये. मिळालेल्या न्यायाबददलची माहिती/गोपनियता ठेऊन प्रसारित करता येईल.

# कलम 17: तक्रार आणि चौकशी

## कामकाजातील मजकुर छापण्याबद्दल दंड

जी व्यक्ती कलम 16 चा भंग करेल ती व्यक्ती सेवा शर्ती नियमानुसार कारवाईस पात्र असेल.

## प्रकरण - 8

## कलम 26: कायदयातील तरतुदींचे पालन न केल्यासाठी दंड

जेव्हा नियोजन/मालक कायदयातील तरतुदीनुसार समितीचे गठण करण्यास अथवा इतर तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास अयशस्वी ठरेल- तेव्हा अशा व्यक्तीस रु.50,000/- पर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते.

## प्रकरण - 6

## नियोजक/मालकाचे कर्तव्ये

(क ) कर्मचा-यांना कायदयातील तरतुदींबाबत सचेतन करण्यासाठी कार्यशाळा आणि जागृती कार्यक्रमांचे आयोजन करणे,

(ड) अंतर्गत किंवा स्थानिक समितीस योग्य त्या सुविधा पुरविणे.

# Work Culture and Work ethics

## कार्य निती आणि कार्यसंस्कृती

कामाच्या ठिकाणी कार्यनिती आणि कार्यसंस्कृती रुजविणे आवश्यक आहे, कार्यनिती आणि कार्यसंस्कृती  शिवाय कार्यालयात काम करण्यासाठी पोषक वातवारणाची निर्मिती अशक्य आहे.  आदर्श कर्मचारी पुरस्कार देतांना  त्या कर्मचा-याने कार्यालयात कार्यनिती आणि कार्यसंस्कृती रुजविण्यासाठी केलेले प्रयत्न हे आदर्श कर्मचारी निकषात महत्वपुर्ण ठरतात.

## “Power point Presentaion “ साठी वापरण्यात आलेली संदर्भ सुची

### शासन निर्णय व परिपत्रके

- शासकिय परपित्रक क्रमांकः एस-आर.व्ही-1071/डी, दिनांक 15 जूलै 1972.
- शासकिय परपित्रक क्रमांकः एस-आर.व्ही-1082/सी-आर-34/16-अ, दिनांक 30 ऑगस्ट 1989.
- शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः एस.आर.व्ही-1099/73/मकआ, दिनांक 19 मे 1999.
- शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण 2000 प्र.क्र.336/का-02, दिनांक 06 फेब्रुवारी 2001.
- शासन परिपत्रक क्रमांक :सीडीआर 1002/1098/प्र.क्र.2/97, दिनांक 18 सप्टेंबर 2002.
- शासन निर्णय क्रमांक : एसआव्ही 10.03/36/प्र.क्र.6/2003/मकअ, दिनांक 5 जानेवारी 2004
- शासन परिपत्रक क्रमांक : मकचौ 2004/प्र.क्र.01/2004, दिनांक 3 ऑगस्ट 2004.
- शासन निर्णय क्रमांक : मकचौ 2005/ प्र.क्र.16/05, दिनांक 20 जानेवारी 2006.
- शासन परिपत्रक क्रमांक : मकचौ 2006/प्र.क्र. 10/मकक, दिनांक 17 मे 2006
- शासन निर्णय क्रमांक : मकअ 2006/प्र.क्र. 01/मकक, दिनांक 27 जूलै 2006
-

- अध्यक्ष्य, राज्य महिला तक्रार निवारण समिती यांचे अ.शा.प. क्रमांकः मकचौ 2006/प्र.क्र.15/मकक, दिनांक 04 सप्टेंबर 2006
- शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. मकचौ-2006/प्र.क्र.15/ दिनांक 19 सप्टेंबर 2006
- शासन परिपत्रक क्रमांक मकक 2010/प्र.क्र.46/मबावि/ 11 जून 2010.
- शासन निर्णय क्रमांक : मकचौ/कमक /मबावि/ 9 डिसेंबर 2010.
- शासन निर्णय क्रमांक : मकचौ/2013 /प्र.क्र.-63/ मकक/मनाविवि/ 19 जून 2014.

- महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक ) नियम, 1979: 22-अ

  ( The Maharashtra Civil Services {Conduct } Rules 1979 – 22-A )
- मानव अधिकार संरक्षण अधिनियम 1993
- माहितीचा अधिकार अधिनियम 2005.
- संविधानाने प्रदान केलेले मूलभुत हक्क व कर्तव्ये.

- JUDGEMENT : Vishakha and others V. State of Rajasthan: 13th August 1997.
- JUDGEMENT : MEDHA KOTWALLELE AND OTHERS Vs Union of India : 19th October 2012.
- JUDGEMENT: Rupan Deol Bajaj Vs KPS Gill
- महिलांची कामाच्या ठिकाणावर होणारी लैंगीक छळवणुक ( प्रतिबंध, मनाई आणि इलाज ) अधिनियम 2013.
- महिलांची कामाच्या ठिकाणावर होणारी लैंगीक छळवणुक ( प्रतिबंध, मनाई आणि इलाज ) नियम 2013.
- The Indian penal code 1860 ( The code of Criminal Procedure {Amendement } Act 2005 ) Section 209, Section 354, Section 509